


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख १३ जुलै, १९४९ अंक २८


## धी कोपरगांव पीपल्स को. ऑ. बँक लि.

**कोपरगांव, जि. अहमदनगर.**

( उद्घाटन समारंभ : ता. १७-१-१९४९ )

कोपरगांव येथील अत्यंत प्रतिष्ठित नागरिक यांचे देखरेखीखालीं स्थापित झालेली आणि आधुनिक पद्धतीवर बँकिंगचे सर्व व्यवहार करणारी.

**स्थानिक सहकारी बँक**

**सुरुवातीचें शेअर भांडवल : ६८,७५० रु.**

बिलें वसुली, हुंड्या, मुंबईवरील चेक्स, ड्राफ्टस, वगैरे व्यवहार केले जातात.

आकर्षक व्याजावर मुदतीच्या ठेवी ३ महिनेपासून ५ वर्षे-पर्यंत स्वीकारल्या जातील.

सेव्हिंग्ज बँकेंत रु. १०,००० पर्यंत व्याज देणेंत येतें.

**विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा.**

| | |
|---|---|
| जी. पी. ठाणेकर बी. ए. मॅनेजर | मोहनलाल कालिदास व्यास चेअरमन |

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

*पॅलेस स्ट्रीट, सातारा*

शाखाः—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-४८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २०,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,३१,००० |
| ठेवी | रु. | ७१,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८९,००,००० |

**मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :**

| १ वर्ष | दोन वर्ष | तीन अगर अधिक वर्षें |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-०-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

| | |
|---|---|
| सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर. | वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन. |

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

**( शिड्यूल्ड बँक )**

**प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग**

**पुणें २.**

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१५,१६५ |
| खेळतें भांडवल | रु. | ७१,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

| | |
|---|---|
| श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर | श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर |

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें

## सर्व प्रसिद्ध माल

भिंतीला लावण्याचे रंग, छापण्याची शाई,
एनॅमलचे कच्चे व पक्के रंग

केळकर बंधू, बुधवार चौक, पुणे २ | केळकर बंधू, (शाखा) मेनरोड, नाशिक.

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)


# विविध माहिती

**हैदराबादमधील तेलाच्या गिरण्या**—हैदराबाद संस्थानांतील शेंगदाणा फार मोठ्या प्रमाणावर निर्यात केला जात असल्यानें तेलाच्या गिरण्यांना पुरेसा पुरवठा होत नाहीं असें समजतें. सरकारनें शेंगदाण्याची निर्यात तावडतोब थांबविली नाहीं तर कारखाने बंद करूं, अशी धमकी कारखानदारांनीं दिली असल्याची बातमी आहे.

**काश्मीरकडे भाजीच्या बियाणाची मागणी**—काश्मीर आणि जम्मू सरकारच्या शेतकी खात्याकडे ४,००,००० रुपये किंमतीचें भाजीपाल्याचें बीं-बियाणें पुरविण्याची मागणी संस्थानाबाहेरून आली आहे. बीं-बियाणाच्या निर्यातीवर जकातीच्या रूपानें काश्मीर सरकारला दरवर्षी ४०,००० रुपयांचें उत्पन्न होईल, असा अंदाज आहे.

**हिंदी टेलिग्राफसाठी सांकेतिक भाषा**—बंगाल-नागपूर रेल्वेवर काम करणाऱ्या एका सिग्नलरनें हिंदी भाषेंत तारा करण्यासाठी एक सांकेतिक लिपी तयार केल्याचें समजतें. ह्या लिपींत अक्षरांसाठी ४२ खुणा, आकड्यांसाठी १० खुणा, जोडाक्षरांसाठी ३ खुणा आणि विराम चिन्हांसाठी १२ खुणा आहेत.

**विड्या तयार करण्यास मनाई**—पावसाळ्यांतील पेरणीचीं आणि वेणण्याचीं कामें करण्यासाठीं मजूर मिळावेत म्हणून जबलपूरच्या डेप्युटी कमिशनरनें एक हुकूम काढून ता. १ जुलै ते १५ ऑगस्टपर्यंत विड्यांच्या कारखान्यांना आपलें काम बंद ठेवण्यास फर्मावलें आहे. ज्या खेड्यांची लोकवस्ती ३,००० पेक्षा कमी असेल अशा खेड्यांतील विड्यांच्या कारखानदारांनीं वरील सात आठवड्यांच्या मुदतींत कोणाही धडधाकट मजुराला विड्या करण्यासाठी कामावर घेऊं नये, असा हुकुमाचा आशय आहे.

**पूर्व पंजाबांत मुसलमानांना जमिनी**—फाळणीनंतर पाकिस्तानांत गेलेल्या पण नंतर पुन्हा परत आलेल्या अगर येऊं इच्छिणाऱ्या मुसलमानांना ५०,००० एकर जमीन देण्याचें पूर्व पंजाब सरकारनें ठरविलें आहे. शक्यतोंवर पूर्वी ज्या जमिनी त्यांच्या मालकीच्या होत्या त्याच त्यांना परत करण्यांत येणार आहेत.

**वनस्पति तेलाच्या किंमती वाढल्या**—वनस्पति तेलाच्या किंमती दर पौंडामागें ९ पैनीं वाढविण्यांत आल्या आहेत. किंमतींत झालेली ही वाढ मद्रास, मध्यप्रांत आणि बिहार ह्या प्रांतांना लागू करण्यांत आली आहे. हिंदुस्थानांत इतरत्र दर पौंडामागें ३ पै किंमत वाढविण्यांत आली आहे. शेंगदाण्याच्या तेलाच्या किंमतींत वाढ झाल्यामुळें वनस्पति तेलाच्या किंमतींतील वाढीला हिंद सरकारनें मंजुरी दिली आहे.

**मुंबई प्रांतांतील स्टेट ट्रॅन्सपोर्ट**—मध्यवर्ती विधिमंडळानें गेल्या वर्षी मंजूर केलेल्या कायद्याप्रमाणें मुंबई सरकार स्टेट ट्रॅन्सपोर्ट कॉर्पोरेशन स्थापन करणार असून त्यांतील ७५ टक्के भाग स्वतःच घेणार आहे. उरलेले भाग हिंद सरकारचें रेल्वेखातें घेईल. मात्र ज्या मार्गांवर रेल्वेज नाहींत त्यांवरील बोट-वहातूक कंपन्यांना आपल्या भागांपैकी २० टक्के भाग रेल्वेखातें देणार आहे. स्टेट ट्रॅन्सपोर्ट चालविण्याच्या दृष्टीनें मोटार व्हेइकल्स ॲक्टमध्यें जरूर असलेली दुरुस्ती मुंबईच्या विधिमंडळाच्या येत्या अधिवेशनांत करण्यांत येणार आहे. स्टेट ट्रॅन्सपोर्ट कॉर्पोरेशन चालू वर्षअखेर स्थापन करण्यांत येईल.

**अन्नधान्याची मोहीम आणि सुपर फॉस्फेट्स्**—हिंदुस्थान अन्नधान्याच्या दृष्टीनें दोन वर्षांत स्वयंपूर्ण करण्याची जोराची खटपट चालू असल्यानें देशांतील सुपर फॉस्फेट्स् खतें तयार करणाऱ्या कारखान्यांची प्रगति होणार आहे. सध्या देशांत हें खत तयार करणारे ११ कारखाने असून त्यांची वार्षिक उत्पादनक्षमता सुमारें ८१,००० टन आहे. १९५० मध्यें ह्या खताचें उत्पादन १,००,००० टन होईल. आणि १९५१ मध्यें १,३०,००० टन होईल असा अंदाज आहे. ह्या खताचें उत्पादन करणारे जे कारखाने बंदराजवळ असतील त्यांतून तयार होणाऱ्या दर टन खताची किंमत २१० रुपये असावी असें सरकारनें ठरविलें आहे. देशाच्या अंतर्भागांत असणाऱ्या कारखान्यांत तयार होणाऱ्या खताच्या किंमतींत गंधक आणि रॉक फॉस्फेट ह्यांच्या वहातुकीचा खर्च मिळविण्यांत येणार आहे.

**एप्रिल महिन्यांतील औद्योगिक तंटे**—मार्च १९४९ पेक्षा एप्रिल महिन्यांत हिंदमधील औद्योगिक तंट्यांत २३ टक्क्यांनीं वाढ झाली. वाया गेलेल्या दिवसांची संख्या मात्र ११,७२५ दिवसांनीं कमी भरली. एप्रिल महिन्यांत १०३ औद्योगिक तंटे उपस्थित झाले आणि त्यांत ७३,१३३ मजुरांनीं भाग घेतला. मार्चमध्यें हे आकडे अनुक्रमें ८४ आणि ६७,२०१ असे होते. एकूण तंट्यांपैकी ३७ पश्चिम बंगालमध्यें झाले. त्याच्या खालोखाल मुंबईंत २९ झाले. काम करण्याचे सर्वांत अधिक वाया दिवस कापडाच्या गिरण्यांतून गेले.

**मद्रास प्रांताची घरांची योजना**—मद्रास प्रांताचें सरकार प्रॉव्हिन्शिअल हौसिंग कमिटीनें सादर केलेल्या घरें बांधण्याच्या योजनेचा विचार करीत आहे. ह्या योजनेप्रमाणें खेडेगांवांतून ४२,००,००० घरें बांधण्यांत यावयाचीं आहेत.

**रबराच्या मळ्यांत संप?**—सीलोनमधील मजुरांच्या तिन्ही संघटनांची एक संयुक्त बैठक भरून ता. १५ जुलै रोजीं रबराच्या मळ्यावर काम करणाऱ्या ५०,००० कामगारांनीं एक दिवसाचा संप करावा असा ठराव मंजूर करण्यांत आला. वेजेस बोर्डस् ऑर्डिनन्सच्या कक्षेंतून रबराचे मळे वगळणें, कामगारांच्या संख्येंत कपात करणें, काम वाढविणें, इत्यादि संपाचीं कारणें नमूद करण्यांत आलीं आहेत.

**हिंद-पाकमधील व्यापार**—गेल्या महिन्यांत हिंदुस्थान आणि पाकिस्तान ह्यांच्यांत झालेल्या व्यापारी कराराप्रमाणें चालू हिशेबाच्या वर्षांत दोन्ही देशांमध्यें जवळजवळ २०० कोटी रुपये किंमतीच्या मालाचा व्यवहार होईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**पाकिस्तानचें इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन**—ता. १५ जुलै, १९४९ रोजीं पाकिस्तानचें इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन अस्तित्वांत येणार आहे. संस्थेचें भांडवल ३ कोटी रुपयांचें आहे. एकूण भांडवलच्या ५१ टक्के भांडवल सरकार गुंतविणार असून बाकीचें सार्वजनिक विक्रीसाठी खुलें ठेवण्यांत येणार आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १३ जुलै १९४९





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## हिंदी साखरेचा धंदा

### संरक्षणाचा पूर्वेतिहास आणि पुढील प्रश्न

हिंदी साखरेच्या धंद्याच्या संरक्षणाची मुदत मार्च, १९५१ अखेर, २ वर्षांनीं वाढविण्यांत यावी असें टॅरिफ बोर्डानें नुकतेंच सुचविलें होतें. परंतु सरकारनें ती मुदत एकाच वर्षानें वाढविली आहे. टॅरिफ बोर्डाच्या मुख्य शिफारसी खालीलप्रमाणें आहेत:— (१) संयुक्त प्रांत आणि बिहार येथें साखर कारखाने केंद्रित झाले आहेत, ते तेथून अधिक सोइस्कर ठिकाणीं हलवावेंत. (२) ई. सेंट्रल शुगरकेन कमिटीला संशोधन व वाढ ह्याच्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठीं पुरेसे पैसे द्येणें. (३) योग्य पातळीवर साखरेच्या किंमती आणून ठेवणें. उसाची किंमत उतरण्यावरच साखरेची किंमत खाली येणें मुख्यतः अवलंबून आहे, हें उघड आहे. साखर स्वस्त झाली, म्हणजे तिचा खप वाढेल आणि शिलकी साखरेचे वाढते साठे कमी होतील अशी अपेक्षा आहे. साखरेचा उत्पादन खर्च कमी होईपर्यंत त्या धंद्यास संरक्षणाची जरूरी आहे, असें मत टॅरिफ बोर्डानें नमूद केलें आहे. सध्याच्या आयात साखरेच्या किंमतीच्या मानानें, चालू संरक्षक जकात ३६% पडते.

हिंदुस्थान सरकारनें जकातविषयक धोरणाची छाननी करण्यासाठी फिस्कल कमिशन नेमलें आहे. कमिशनच्या चौकशींत आजवरचें जकातविषयक धोरण कितपत यशस्वी झालें, त्याची छाननी अर्थातच केली जाईल. विशेषतः लोखंड—पोलाद, कपास—कापड, साखर, कागद व आगपेट्या ह्या महत्त्वाच्या धंद्यांची कसून तपासणी केली जाईल. साखरेच्या धंद्याचें महाराष्ट्रास विशेष महत्त्व असल्यानें, त्याच्या संरक्षणाचा थोडासा पूर्वेतिहास बोधप्रद होईल.

१९३२ सालापूर्वी साखरेच्या धंद्यास संरक्षण असें नव्हतें; सरकार साखरेच्या आयातीवर कर बसवीत असे परंतु तिचा मुख्य उद्देश सरकारी उत्पन्न वाढविणें, एवढाच होता. १८९४–९५ ते १९१५–१६ अखेर हा कर ५% होता, तो १९१६ सालीं १०% करण्यांत आला. १९२१ सालीं तो १५% व १९२२ सालीं २५% करण्यांत आला. १९२५ सालीं ह्या कराचें स्वरूप बदलण्यांत आलें. म्हणजे, ह्यापूर्वी तो आयात साखरेच्या किंमतीवर घेण्यांत येत असे, त्याचें रूपांतर आतां दर हंड्रेडवेट आयातीवर ४ रु. ८ आ. अशा स्वरूपांत करण्यांत आलें. त्याचा प्रत्यक्ष बोजा ५०% पडला. १९३० सालीं, कर वाढविण्यांत येऊन तो ६ रु. करण्यांत आला. जावाची साखर स्वस्त झाल्यामुळें, त्याच्या आयातीवरील दर हंड्रेडवेटास आकारण्यांत येणाऱ्या कराचा बोजा वाढत गेला. ह्या बोजाचें प्रमाण आतां १२०% झालें. १९३१ सालीं जावाची साखर आणखी उतरली परंतु आयात कर ७ रु. ४ आ. केल्यामुळें प्रत्यक्ष कराचा बोजा १९०% झाला. पुढें ह्या जकातीवर २५% सरचार्ज बसविण्यांत येऊन, कराची आकारणी ९ रु. १ आ. दरानें करण्यांत येऊं लागली. परंतु जावाची साखर महाग दरानें येऊं लागल्यामुळें तिचेवरील बोजाचें प्रमाण १६५% झालें. अशा रीतीनें, हिंदी साखरेच्या धंद्याभोवती आयात कराची मोठी भिंत निर्माण होऊन, देशी धंद्यास पुष्कळच अवसर मिळाला. अर्थात्, देशी साखरेच्या धंद्यास संरक्षण देऊन त्याची वाढ घडवून आणणें, हा हेतु आयात कराच्या मुळाशीं नव्हता; त्या कराचा तो केवळ एक अप्रत्यक्ष परिणाम होता. मार्च १९२२ अखेर हें चालू होतें.

१९३० सालीं इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्चच्या सूचनेवरून हिंदी साखरेच्या धंद्यास संरक्षण देण्याचा प्रश्न टॅरिफ बोर्डाकडे सोपविण्यांत आला. टॅरिफ बोर्डानें साखरेच्या धंद्याच्या संरक्षणाप्रीत्यर्थ, आयात होणाऱ्या साखरेवर दर हंड्रेडवेटास ७ रु. ४ आ. ह्याप्रमाणें संरक्षक जकात सुचविली. एप्रिल १९३२ मध्यें पास झालेल्या शुगर इंडस्ट्री प्रोटेक्शन ॲक्टानें वरीलप्रमाणें टॅरिफ बोर्डाच्या सूचनेस अनुसरून जकात बसवून त्यांत १ रु. १३ आणे सरचार्जची भर घातली. संरक्षणाची मुदत १४ वर्षें म्हणजे ३१ मार्च, १९४६ अखेर ठरविली. परंतु प्रारंभाची ७ रु. ४ आण्याची संरक्षक जकात ३१ मार्च, १९३८ अखेरच अमलांत रहावयाची होती. सरचार्जच्या छत्राखाली, म्हणजे आवश्यक त्या संरक्षणापेक्षा अधिक संरक्षण मिळाल्यामुळें, साखरेच्या कारखान्यांची संख्या जलद वाढत गेली. वाढत्या अंतर्गत उत्पादनामुळें साखरेवरील जकातीचें उत्पन्न बुडालें आणि साखर कारखानदारांनीं मोठाले नफे केले तरी ऊंस लावणाऱ्या शेतकऱ्यांची परिस्थिति पूर्ववतच राहिली. ह्यासाठीं, सरकारनें १९३४ सालीं हिंदी कारखान्यांच्या उत्पादनावर दर हंड्रेडवेटास १ रु. ५ आ. ह्याप्रमाणें एक्साइज कर लादला. त्याचप्रमाणें, कारखान्यांनीं ऊंस कोणत्या किंमतीस विकत घ्यावा, तें ठरवून देण्याचा अधिकार प्रांतिक सरकारांस दिला. हिंदी साखरेच्या धंद्यास आरंभीं आयात कराचा व पुढें संरक्षक जकातीचा फायदा मिळूनहि, त्या धंद्यानें करावी त्या पद्धतीची सुधारणा घडवून आणलेली नाहीं आणि आज हिंदी साखर निर्गत करतां येण्याजोगा त्याचा उत्पादन खर्च उतरलेला नाहीं. उसाची किंमत उतरविण्यासाठी उंसाच्या लावगडीबाबत संशोधन करून उंसाचें दर एकरीं उत्पादन व त्याचा उतारा वाढविण्याचे प्रयत्न जारीनें केले पाहिजेत. ह्यासाठीं एक तज्ज्ञांची कमिटी आतां नेमण्यांत येत आहे, साखर कारखानदारांचें "वर्तन" सुधारण्याचा अवघड प्रश्नहि सोडविण्यांत आला पाहिजे.

क्युबाची साखर आयात करण्यासाठीं पाकिस्तान सरकारनें ग्रेटब्रिटनकडे डॉलर्सची मागणी केली आहे. आयात साखरेची हिंदी बंदरांत किंमत दरमणी १६ रु. १२ आ. ९ पै. पडते, त्यांत ३०% घट होण्याचा संभव आहे. ह्या उलट हिंदी साखरेची किंमत दरमणी २८ रु. ८ आ. ६ पैच्या खाली जाऊं शकत नाहीं. म्हणजे, क्युबाच्या व हिंदी साखरेच्या किंमतींत दरमणी सुमारें १२ रु. फरक पडतो! अशा परिस्थितींत, हिंदी साखरेचा उत्पादन खर्च उतरल्याखेरीज, कृत्रिम संरक्षणाचा फार काय उपयोग होणार ? पाकिस्तानासारखी जवळची बाजारपेठहि आपणांस पारखी होऊं लागली, तर इतर देशांकडे निर्गत कशी होऊं शकणार ? उसाचें व साखरेचें, मुख्यतः उसाचें, उत्पादन अधिक कार्यक्षम होण्यावरच हिंदी साखरेच्या धंद्याचें भवितव्य अवलंबून आहे. ह्यासंबंधांत महाराष्ट्रांतील विशिष्ट परिस्थिति अधिक समाधानकारक आहे, हें सुप्रसिद्धच आहे.

—×—

## स्थानिक स्वराज्य कारभार सुधारण्याचे कांहीं मार्ग

*( पुणें रोटरी क्लबांत पुणें म्युनिसिपल कमिशनर श्री. एस. जी. बर्वे, आय. सी. एस. ह्यांचें नुकतेंच व्याख्यान झालें. त्याचा महत्त्वाचा गोषवारा येथें दिला आहे. )*

"लहान पंचायती पासून ते जिल्हा लोकल बोर्डें व कॉर्पोरेशन्स, ह्याप्रमाणें स्थानिक स्वराज्य संस्थांची संख्या पुष्कळच मोठी आहे. प्राथमिक शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, इत्यादींसारखीं वाढत्या महत्त्वाचीं कामें त्यांचेकडे सोपविलेलीं आहेत. स्वराज्य-प्राप्तीनंतर, आतां आपल्या देशांत ' पोलिसी ' सरकारचें " सामाजिक उद्धाराच्या " सरकारांत स्थित्यंतर होत असलेलें आपण पहात आहों. तेव्हां, ह्यापुढें शिक्षण, आरोग्य, इत्यादि विषयांचें महत्त्व वाढत जाणार हें स्पष्ट आहे. सहाजीकच, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामगिरीचा आपल्या देशाच्या हिताशीं जिव्हाळ्याचा संबंध येतो.

" आपल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराबद्दल सर्वत्र असंतोष पसरलेला दिसतो, आणि तो बराच काळ टिकून असलेला आढळतो. ह्या परिस्थितीची शांतपणें छाननी केली, तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्याकडून पुरेशी कामगिरी न होण्यास तीन प्रकारचीं कारणें आहेत, हें लक्षांत येईलः—(१) त्यांच्या मोठ्या व वाढत्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास पुरी पडेल, एवढी त्यांचेजवळ पैशाची तरतूद नाहीं. ( २ ) त्यांना सरकारकडून उपयुक्त मार्गदर्शन आणि सल्ला सतत मिळत रहाण्याची जी अपेक्षा आहे, ती पुरी झालेली नाहीं. पूर्वी जी सरकारी देखरेख होई, तिचें स्वरूप लोहाराच्या घणासारखें होतें. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह इन्कायरी कमिटीनें सुचविल्या-प्रमाणें, असा नुसता घण उपयोगी नाहीं; आवरण्यासाठी लगाम आणि उत्तेजन देण्यासाठी टोचणीहि पाहिजे. ( ३ ) धोरण आखणें आणि त्याची तपशिलवार अंमलबजावणी करणें हीं कामें अलग करून त्यांपैकी धोरण आखण्याचें काम लोकनियुक्त संस्थांना देणें आणि अंमलबजावणीचे कामीं अधिकारी वर्गास आवश्यक ती सर्व मोकळिक देऊन वाव देणें अगत्याचें आहे. स्थानिक स्वराज्य संस्था कालांतरानेंहि अपेक्षित प्रगति करणार नाहींत आणि जनतेच्या त्यांचेसंबंधीं ज्या अपेक्षा आहेत त्या फलद्रूप होणार नाहींत, अशी आज निराशा लोकांना वाटते. परंतु वरील तीन प्रकारचीं कारणें दूर करण्यासाठी कायदा करून सुधारणा केली, तर ह्या संस्थांच्या बाबतींत अशी निराशा वाटण्याचें कारण उरणार नाहीं. "

**हिंदमधील औद्योगिक अस्वस्थता**—हिंदचे मजूर मंत्री श्री. जगजीवनराम ह्यांनीं दिल्ली येथें कॅांग्रेस कार्यकर्त्यांपुढें बोलतांना असे उद्‍गार काढले कीं, इतर कित्येक देशांपेक्षा हिंदमध्यें आज कमी औद्योगिक अस्वस्थता आहे. हिंदमधिल मजूर बुद्धि-मान आणि दूरदृष्टि असून, संप आणि टाळेबंदी करण्यानें आपल्यापुढील विविध प्रश्न सुटणार नाहींत हें त्यांनीं ओळखलं आहे.

**गरीब कुळांना सवलती**—मागासलेल्या जातींतील ज्या शेत-कऱ्यांना स्वतःच्या जमिनी नाहींत आणि जे सध्या सरकारी मालकीच्या जमिनी करून आहेत त्यांना जमिनीवरून काढून टाकण्यांत येऊं नये, असा हुकूम मद्रास सरकारनें काढला आहे. अशा शेत-कऱ्यांच्या ताब्यांत सध्या ज्या जमिनी असतील त्यांपैकी बागाईत जमीन ५ एकर आणि जिराईत १० एकर प्रत्येक कुळाला काय-मच्या वहिवाटीसाठी देण्यांत येणार आहे.

### वैमानिक वहातूक स्वस्त करण्याची सूचना

हिंदुस्थानांतील विमानांच्या प्रवासाचे दर कमी कसे करतां येतील, ह्याबद्दल हिंदुस्थान सरकार वहातुक कंपन्यांशीं विचार-विनिमय करीत आहे. अर्थात्, वहातूक स्वस्त झाली तरी त्यामुळें प्रवासाचा धोका मात्र वाढतां कामा नये. नाहींतर, वैमानिक वहातुकीवर लोकांचा विश्वास वाढत चालला आहे, त्यासच बाध यावयाचा आणि त्यामुळें मूळ उद्देश साध्य होण्याचें राहून जावयाचें. अशी एक सूचना पुढें आली आहे कीं, कमी सुखकारक असा स्वतंत्र दुसरा वर्ग निर्माण करून त्यांत सुखसोई कमी ठेवाव्या, एअर होस्टेसेस नसल्या तरी चालतील, कमाल लगेजची मर्यादा उतरवावी आणि सध्या प्रत्येकास स्वतंत्र खुर्ची मिळते ती न देता बाकें ठेवण्यांत यावीं. ह्या पद्धतीनें कदाचित् अधिक उतारू मिळूं शकतील आणि आज ज्या कांहीं प्रवासास पुरेसे उतारू मिळत नाहींत, ते मिळूं लागतील. तथापि, विमान वहातुकीच्या कंपन्यांचा कारभार आज किफायतशीर होत नाहीं, तो होऊं लागण्यास एवढ्यानें थोडाफार तरी हातभार लागेल किंवा नाहीं, ह्याची शंकाच आहे. कारण, १९४८ सालीं आठ कंपन्यांपैकी चार कंपन्यांनीं नुकसान दाखविलें. सरकारनें पेट्रोलवर रीबेट देऊन अप्रत्यक्ष मदत केली, तिची रक्कम ४२ लक्ष रुपये भरली.

### मध्यभारतांत औद्योगिक प्रगतीस वाव

मध्यभारतामध्यें ४५,००० चौ. मैल प्रदेश समाविष्ट आहे. त्यांत सध्या १७ सुताच्या व कापडाच्या गिरण्या ( त्यांपैकी ७ इंदूरमध्यें व ४ उज्जैनमध्यें ), ५ साखर कारखाने, १ सिमेंटचा कारखाना, कित्येक इंजिनिअरिंग वर्कशॉप्स, २ काच कारखानें, १ आगपेट्यांचा कारखाना, १ पॉटरीचा, १ कातड्याचा, ह्या प्रमाणें कारखाने आहेत. त्यांत व इतर उद्योगधंद्यांत मिळून सुमारें ४ कोटी रु. भांडवल गुंतलेलें असावें. क्षेत्रफळाच्या दृष्टीनें पहातां; मध्यभारत सबंध हिंदच्या एक विसांश असून त्यांत सबंध हिंदच्या एक चौदांश लोकसंख्या आहे. परंतु, गुंतलेलें औद्योगिक भांडवल पाहिलें, तर तें सबंध हिंदुस्थानच्या मानानें शेकडा अर्धा टक्काहि भरत नाहीं. नव्या उद्योगधंद्यांचे कित्येक उपक्रम मध्यभारतांत हातीं घेण्यांत येत आहेत, त्यांस तेथील वीज उत्पादनाच्या योजनांचा चांगला उपयोग होईल. मध्यभारताच्या डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीजनें "हॅंडबुक ऑफ मध्यभारत इंडस्ट्रीज" ह्या नांवाचें एक लहानसें पुस्तक प्रसिद्ध करून त्यांत ही सर्व माहिती दिलेली आहे.

### संस्थानें विलीन झाल्यामुळें वाढलेलें क्षेत्र व लोकसंख्या

मुंबई प्रांतांत संस्थानें विलीन झालीं, त्यामुळें एकूण ३८,३५७ चौ. मैल प्रदेशाची व ८३,४९,००० लोकसंख्येची भर पडली आहे. त्याचा तपशील असाः—

| संस्थानें | क्षेत्र ( चौ. मैल ) | लोकसंख्या |
|---|---|---|
| १७ दक्षिणी संस्थानें | ७,६५१ | १६,९३,००० |
| १८ गुजराती संस्थानें | १९,३०० | २७,०९,००० |
| कोल्हापूर | ८,१७६ | २८,५५,००० |
| बडोदें | ३,२३० | १०,९२,००० |
| | ३८,३५७ | ८३,४९,००० |

**अमेरिकेंतील रहाणीचा निर्देशांक**—अमेरिकन सरकारच्या मजूर खात्यानें असें जाहीर केलें आहे कीं, अमेरिकेच्या निर्देशांकांत एप्रिलच्या मध्यापासून ते मे अखेरपर्यंत .३ टक्क्यांनीं घट झाली आहे.

## हिंदचा परराष्ट्रीय व्यापार

३१ मार्च, १९४९ अखेर संपलेल्या बारा महिन्यांत हिंदुस्थानाच्या परराष्ट्रीय व्यापाराची किंमत ९४१ कोटी रुपये भरली; त्यापूर्वीच्या वर्षी ती ८०२ कोटी रुपये झाली होती. खालील तक्त्यांत आयात-निर्गतीचे तुलनात्मक आकडे दिले आहेत, त्यापैकी १९४७–४८ चे आकडे अखंड हिंदुस्थानाबाबत असून १९४८–४९ चे आकडे स्वतंत्र हिंदचे आहेत.

( लक्ष रुपये )

| | १९४७–४८ | १९४८–४९ |
|---|---|---|
| आयात | ३९८,६२ | ५१८,०० |
| निर्गत | ३९५,३१ | ४१५,५३ |
| पुनर्निर्गत | ७,८८ | ७,२९ |
| समुद्रमार्गे झालेल्या परराष्ट्रीय व्यापाराची परिस्थिति | + ४,५७ | –९५,१८ |

### पाकिस्तानची अनुकूल तफावत कशी ?

हिंदुस्थानास परराष्ट्रीय व्यापारांत प्रतिकूल तफावत एकसारखी अनुभवास येत आहे. परंतु, पाकिस्ताननें गेल्या वर्षी आयातीपेक्षा निर्गत ७२ कोटींची ज्यास्त केली अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे, तिचेबद्दल आश्चर्य प्रकट केलें जात आहे. पाकिस्ताननें समुद्रमार्गे केलेल्या आयातीचे व निर्गतीचे आकडे पाहिले, तर ते अनुक्रमें १०९·३७ कोटी रु. व ८५·७१ कोटी रु. असे आहेत. म्हणजे त्यांत आयातीपेक्षा निर्गत २३·६६ कोटी रुपयांनीं कमीच आहे. हिंदुस्थान व पाकिस्तान ह्यांचेमध्यें जर्मांनीच्या सरहद्दी ओलांडून जो व्यापार झाला, त्यांत पाकिस्तानास ९५ कोटी रुपये अनुकूल तफावत राहिली. त्यामुळें, इतर देशांशीं समुद्रमार्गानें जो व्यापार झाला, त्यांत पाकिस्तानला प्रतिकूल अनुभव आला, तरी सर्व व्यापार लक्षांत घेतां अखेर वाढीवी उरला असा एकंदर अर्थ आहे.

### हिंदुस्थानांत कोणता माल आयात झाला ?

प्रमुख आकडे

( लक्ष रुपये )

| | १९४७–४८ | १९४८–४९ |
|---|---|---|
| यंत्रसामुग्री | ५९,१४ | ८०,८७ |
| धान्य इ. | २३,०० | ६६,५१ |
| कपास | ३१,२० | ६४,२३ |
| तेलें | ३६,९७ | ३७,६६ |
| धातू | २३,०३ | ३२,९७ |
| वहानें | २६,६४ | ३२,६८ |
| रसायनें, औषधें | २०,०४ | २८,८९ |
| सूत | ९,५१ | १७,०६ |
| कटलरी, हार्डवेअर | २१,८३ | १६,४४ |
| रंग | १८,०४ | १५,६६ |
| कागद | १४,२१ | १५,०८ |
| विजेचें साहित्य | ९,७२ | ११,४० |
| एकूण आयात | ३९८,६२ | ५१८,०० |

### हिंदुस्थानांतून माल निर्यात कोणता झाला ?

प्रमुख आकडे

( लक्ष रुपये )

| | १९४७-४८ | १९४८–४९ |
|---|---|---|
| ताग, पक्का माल | १२७,८२ | १४६,३१ |
| चहा | ५४,९० | ६३,६९ |
| कापड, सूत | २०,५२ | ३९,८५ |
| ताग ( कच्चा ) | २५,८३ | २३,८९ |
| कपास | ३९,६८ | १९,१५ |
| कातडीं | १४,८८ | १२,६९ |
| तेलें | १२,३० | ११,३४ |
| एकूण | ३९५,३१ | ४१५,५३ |

### हिंदुस्थानांत आयात कोठून झाली ?

प्रमुख आकडे

( लक्ष रुपये )

| साम्राज्यांतर्गत देश | १९४७–४८ | १९४८–४९ |
|---|---|---|
| ग्रेट ब्रिटन | १२०,२४ | १५२,१३ |
| पाकिस्तान( समुद्रमार्गे ) | ... | २२,३७ |
| ऑस्ट्रेलिया | ८,६८ | २०,९३ |
| केनिया | ९,३३ | १०,८० |
| स्ट्रेटस सेटलमेंटस् | ६,३७ | ८,२८ |
| कॅनडा | ९,०० | ७,९१ |
| **इतर देश** | | |
| अमेरिका | १२०,८० | १०४,२४ |
| इजिप्त | २०,४१ | ३१,८९ |
| इराण | २२,४७ | २०,०९ |
| बर्मा | ११,१८ | १८,७७ |
| इटली | ७,४० | १८,२३ |
| जपान | ६ | ६,३७ |
| बेलजम | ५,३६ | ७,१५ |

### हिंदुस्थानांतून निर्गत कोठें झाली ?

प्रमुख आकडे

( लक्ष रुपये )

| साम्राज्यांतर्गत देश | १९४७–४८ | १९४८–४९ |
|---|---|---|
| ग्रेट ब्रिटन | १०५,७४ | ९७,६७ |
| पाकिस्तान ( समुद्रमार्गे ) | ... | ४४,२३ |
| ऑस्ट्रेलिया | २४,२९ | २०,५८ |
| सिलोन | ११,५५ | ११,९४ |
| कॅनडा | ११,५० | ८,३८ |
| **इतर देश** | | |
| अमेरिका | ७९,१३ | ७०,०३ |
| अर्जेंटिना | १०,९२ | १६,६० |
| बर्मा | ११,९३ | ९,९७ |
| फ्रान्स | १०,३९ | ७,२९ |
| नेदरलंड्स | ५,८३ | ७,२५ |
| इजिप्त | ५,४८ | ६,७० |
| इटली | ५,०३ | ६,४७ |

**जागतिक बँकेकडून हिंदला कर्ज**—हिंदुस्थानला जागतिक बँकेकडून १२·५ कोटी ते १५ कोटी डॉलर्सचें कर्ज मिळण्याची शक्यता आहे, असें समजतें. मिळणाऱ्या कर्जापैकी हा पहिला हप्ता होय. ह्या कर्जाचा उपयोग रेल्वेचीं एंजिनें, शेती आणि धरणासंबंधींचीं यंत्रसामुग्री आणि पोलादाचे कारखाने, इत्यादीसाठी करण्यांत येणार आहे. कर्जाचा उपयोग करून उभारलेले कारखाने कसे काय चालत आहेत तें पाहून मग पुढील हप्ते देण्याचा विचार करण्यांत येणार आहे. सध्याचें कर्ज सुमारें दोन–अडीच महिन्यांत हिंदच्या हवालीं करण्यांत येईल.

## डॉलर, पौंड व रुपया

### गंभीर परिस्थिति आटोक्यांत आणण्याचे प्रयत्न

अमेरिका व बाकीचें बहुतेक जग ह्यांचेमधील व्यापार आणि हुंडणावळ ह्यांचे बाबत गंभीर परिस्थिति निर्माण झाली आहे. तिचा बिकटपणा आतां अधिकच वाढला आहे. सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांनीं ब्रिटिश कॉमन्स सभत ६ जुलै रोजीं, ह्या संबंधांतील अडचणी स्पष्टपणें पुढें मांडून फर्स्ट एड म्हणून मलमपट्टीचा एक उपाय जाहीर केला. दूरगामी उपाययोजना निश्चित होण्यास वेळ लागेल आणि ती आखतांना पौंड चलनाच्या गटांतील इतर देशांचें सहकार्य घ्यावें लागेल. त्याचप्रमाणें, एकतर्फी योजना करूनहि भागणार नाहीं; अमेरिकेसहि ती योजना मान्य होणें आवश्यक आहे. पौंड गटांतील देश महान आर्थिक संकटांत सांपडणें अमेरिकेच्याहि हिताचें नाहीं. सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांच्या भाषणांतील मुद्यांचें विशदीकरण करून, हिंदुस्थानाचें ह्या प्रश्नांतील स्थान स्पष्ट करण्याचा प्रयत्न येथें केला आहे.

ग्रेट ब्रिटन व पौंड चलनाच्या गटांतील देश एका बाजूस, आणि अमेरिका व डॉलर चलनाच्या गटांतील देश दुसऱ्या बाजूस, अशी जगांतील देशांची विभागणी झालेली आहे. रशिया अर्थात् ह्या दोन्ही गटांचे बाहेर आहे. ग्रेट ब्रिटन हा पौंडाचा प्रातिनिधिक व अमेरिका हा डॉलरचा प्रातिनिधिक देश होय.

ग्रेट ब्रिटननें अमेरिकेकडे माल धाडला, म्हणजे त्याला पौंडामध्यें त्याचे पैसे मिळतात. त्याचप्रमाणें, अमेरिकेंतून त्यानें माल आयात केला म्हणजे त्यास डॉलरमध्यें पैसे द्यावे लागतात. जितक्या किंमतीचा माल पाठवला तेवढाच आयात केला, म्हणजे पौंडांतील येणें व डॉलरमधील देणें ह्यांत एकवाक्यता निर्माण होते.

परंतु असें क्वचितच घडतें. कधीं येणें वाढतें तर कधीं देणें वाढतें. मालाच्या आयात–निर्गतीवर मुख्यत: हें अवलंबून असतें. गेलीं कांहीं वर्षें ग्रेट ब्रिटनच्या मालाची अमेरिकेंत पूर्वीप्रमाणें विक्री होऊं शकत नाहीं आणि अमेरिकन माल मात्र ग्रेट ब्रिटनमध्यें आयात करावा लागत आहे. ह्याचा अर्थ, पौंड–डॉलर ह्यांचेमधील तोल नाहींसा झाला आहे. आयात–निर्गतींत ग्रेट ब्रिटनला प्रतिकूल तफावत अनुभवास येत आहे. सहाजिकच, आणलेल्या मालाची किंमत देण्यास जे डॉलर हवेत, ते मिळवून देण्यास निर्गत केलेल्या मालाच्या किंमतीचे पौंड असमर्थ झाले आहेत. म्हणजे, अमेरिकन मालाची किंमत देण्यासाठी आवश्यक असलेल्या डॉलरचा तुटवडा–दुष्काळ–पडला आहे.

गेल्या एप्रिलपासून, हा दुष्काळ अधिकच तीव्र झाला आहे. कारण, ग्रेट ब्रिटनची अमेरिकेंतील विक्री आणखी रोडावली आहे. त्यामुळें, त्या विक्रीचे पोटीं पूर्वीइतके डॉलर मिळणें कठीण झालें आहे.

ब्रिटिश मालाची निर्गत सत्वर वाढविली नाहीं, तर आयात–निर्गतीमधील तोल अधिकच बिघडत जाईल. अर्थात, ग्रेट ब्रिटननें माल पाठविण्याचें पुष्कळ ठरविलें, तरी अमेरिकेनें व कॅनडानें तो घेतला पाहिजे ना! ग्रेट ब्रिटननें योग्य किंमतीस चांगला माल दिला, तर आम्हीं तो जरूर घेऊं असें आश्वासन कॅनडाचे अर्थमंत्री, मि. डग्लस ॲबट, ह्यांनीं दिलें आहे!

ग्रेट ब्रिटनची सोन्याची व डॉलरची गंगाजळी, सध्या तिला जें खिंडार पडलें आहे त्याचा विचार करता, फार काळ टिकणें शक्य नाहीं. ज्या वेगानें गंगाजळीचा साठा कमी होत चालला आहे, तो वेग तात्काळ आवरण्याचा प्रयत्न करून परराष्ट्रीय व्यापाराची परिस्थिति सुधारली पाहिजे. हें जाणून, ज्या मालाला डॉलर द्यावे लागतील, अशा मालाची नवी खरेदी तीन महिने तरी अजिबात बंद ठेवण्याचा निर्धार ब्रिटिश सरकारनें केला आहे. परंतु केवळ ह्या बंदीनें कार्यभाग होणार नाहीं. ब्रिटिश मालाचा अमेरिकेंत खप वाढविणें हाच प्रस्तुत अडचणींच्या परिस्थितीवरील खरा उपाय आहे. तोपर्यंत "फर्स्ट एड" देण्यासाठी वरील बंदी घालण्यांत आली आहे.

ब्रिटिश माल बाहेर देशांत केव्हां खपेल? त्याचा उत्पादन खर्च उतरून तो स्वस्त किंमतीस विकतां आला पाहिजे. असें झालें नाहीं, जागतिक बाजारपेठांत ब्रिटिश माल खपूं शकला नाहीं, तर ग्रेटब्रिटनमध्यें आयात होणाऱ्या मालाचा मोबदला देण्यास तो देश असमर्थ होऊन त्यांतील लोकांच्या रहाणीचें मान खालीं जाऊं लागेल. जीवनास आवश्यक अशा गोष्टीहि त्याच्या प्रजाजनांना मिळूं शकणार नाहींत. कारण, आयात मालावरच इंग्रजांच्या आर्थिक संसाराची घडी आधारलेली आहे.

गेलीं दहा वर्षें ब्रिटिश कारखाने तेजींत होते. त्यामुळें उत्पादनाकडे व त्याच्या किंमतीकडे फारसें लक्ष दिलें नाहीं तरी चालत असे. आतां मात्र तसें करून भागणार नाहीं. गिऱ्हाइकांना मालाची, गरज पूर्वीसारखी उरली नसून, कारखानदाराला आतां गिऱ्हाइकांच्या मागें जावें लागत आहे. ह्यासाठीं, माल चांगल्या दर्जाचा व किंमतींत स्वस्त असेल, तरच परदेशांतील गिऱ्हाइक तो घेईल. उत्पादन कार्यक्षमतेनें झालें पाहिजे.

अशा तऱ्हेनें ब्रिटिश मालाचा उठाव केला पाहिजे. त्यासाठीं उत्पादनाशीं संबंध असलेल्या सर्वांचें हार्दिक सहकार्य आवश्यक आहे. उत्पादन खर्च वाढविणारे व त्यामुळें डॉलर मिळण्याची क्षमता कमी करणारे वैयक्तिक प्राप्ती वाढविण्याचे प्रत्यन, त्याचप्रमाणें कामांत दिरंगाई किंवा संप, हीं अजिबात टाळलीं पाहिजेत.

पौंड–डॉलरचा हा प्रश्न अमेरिका व ग्रेट ब्रिटन एवढ्यापुरतांच मर्यादित नाहीं. जगाचा पश्चिम गोळार्ध विरुद्ध बाकीचें जग (त्याचा मोठा व महत्त्वाचा भाग पौंड चलनाचे गटांत येतो) असा हा सामना आहे. सहाजिकच, ह्या सामन्यांत ब्रिटिश साम्राज्यांतील सर्व देश आपोआपच ओढले जातात. तेव्हां, त्यांच्या सल्ल्यानें व सहकार्यानें, हा कठीण प्रश्न सोडविण्याचे मार्ग शोधण्यासाठीं, साम्राज्यांतील अर्थमंत्र्यांची एक परिषद् लंडन येथें बोलविण्यांत आली आहे. तिच्या कामास आज, ता. १३ रोजीं, प्रारंभ होईल. ह्या परिषदेंतील चर्चेच्या अनुरोधानें पुढें उपाययोजना केली जाईल. हा प्रश्न अर्थातच तात्काळ सुटण्याजोगा नाहीं आणि तो सोडविण्यासाठीं कडक उपाय योजावे लागणें अपरिहार्य आहे. पौंड गटाचा नेता ह्या दृष्टीनें ग्रेट ब्रिटन ह्या बाबतींत पुढाकार घेत आहे.

ब्रिटिश सरकारनें आपली अमेरिकेंतील खरेदी तहकूब केली आहे, त्याप्रमाणें हिंदुस्थानानेंहि अमेरिकन मालाची खरेदी मर्यादित करण्याचा प्रयत्न चालविला आहे. ग्रेट ब्रिटनच्या परराष्ट्रीय व्यापाराची जशी परिस्थिति झाली आहे, तशीच परिस्थिति हिंदुस्थानाच्या परराष्ट्रीय व्यापाराचीहि आहे. म्हणजे, आपली आयात ज्यास्त असून त्या मानानें आपली निर्गत होत नाहीं. आपल्या किंमती फार चढीच्या असून मालाचा दर्जा चांगला नाहीं. त्यामुळें परदेशीय बाजारपेठांत आपला माल खपत नाहीं. आयात मात्र चालू आहे! यंत्रसामुग्री, अन्नधान्य, इत्यादी बाहेरून आणावीं लागतात, परंतु त्यांची किंमत देण्यासाठीं पुरेसा माल निर्गत केला पाहिजे. विशेषतः डॉलर मिळविणें अत्यंत कठीण झालें आहे. म्हणजे अमेरिकेकडे आपला माल पुरेसा जात नाहीं आणि अमेरिकन माल घेण्यासाठी त्यामुळें आपण डॉलर उभारूं शकत नाहीं.

" पौंडाची किंमत उतरविण्यांत येणार आहे काय ?" ह्या प्रश्नास सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांनीं " सरकारचा तसा मुळींच विचार नाहीं " असें उत्तर दिलें. ह्यावर टीका करतांना फ्रान्सचे माजी प्रधान व अर्थ मंत्री मि. पॉल रेनो हे म्हणाले कीं, सर स्टॅफर्ड ह्यांचा मार्ग चुकत आहे. डॉलरच्या मानानें सर्वच युरोपियन चलनांची किंमत भारी आहे. त्यांची व पौंडाची किंमत उतरविणें अत्यावश्यक आहे. "ब्रिटिश पौंडाची किंमत उतरविणें क्रमप्राप्तच होईल. तेव्हां, ती जितक्या लवकर उतरविण्यांत येईल, तेवढें उत्तम" असें मत सर चुनीलाल बी. मेहता ह्यांनीं व्यक्त केलें. हिंदुस्थानाचे माजी व्यापार मंत्री श्री. भाभा हे म्हणाले कीं, हिंदुस्थानानें रुपयाचा किंमत उतरवावी. पौंडाची किंमत उतरणें अटळ आहे. सप्टेंबर १९३१ पूर्वी, इंग्लंडनें सुवर्ण चलनाचा त्याग करण्यापूर्वी, तेव्हांचे अर्थमंत्री अशीच ठासून विधानें करीत होते. पौंडाची किंमत कमी करण्याचा निश्चय एकाएकींच जाहीर करावा लागेल.

दुष्प्राप्य डॉलर मिळविण्यासाठीं पौंडाची किंमत उतरविणें किंवा रुपयाची किंमत उतरविणें, हा काय प्रकार आहे ? त्यानें पेंचप्रसंग कसा सुटणार ? तो असाः-पौंड व डॉलर ह्यांची आज जी हुंडणावळ आहे, तिचा दर म्हणजे पौंड व डॉलर ह्यांचेमधील नातें बदलून आयात माल अधिक महाग करणें व निर्गतीस चालना देणें. पौंडाची किंमत उतरवावयाची, ती बाहेरील व्यापारापुरतीच कृत्रिमपणें उतरवावयाची. अंतर्गत किंमत कायमच राहील. त्यामुळें, पूर्वी आयात मालास जी किंमत पडे, तिचेऐवजी आतां ( उदाहरणार्थ ) १०% ज्यास्त पडेल. त्यामुळें आयातीस आडकाठी होईल. ह्या उलट, ब्रिटिश माल अमेरिकेकडे पाठवितांना पूर्वीच्याच मालासाठीं अमेरिकन खरेदीदारास डॉलरच्या हिशेबानें पूर्वी इतकी किंमत द्यावी लागणार नाहीं; कमी द्यावी लागेल. अशा रीतीनें, निर्गतीस उत्तेजन मिळून आयात-निर्गतीचा तोल सुधारेल.

रुपयाची परराष्ट्रीय चलनांच्या देवघेवींतील किंमत उतरविली, तर असाच प्रकार घडून येईल. म्हणजे, येथून निर्गत होणाऱ्या मालास उत्तेजन मिळेल व आयात होणारा माल महाग होईल. रुपयाची किंमत उतरवून, आयात-निर्गतीमधील तफावत 'हुंडणावळीच्या' कृत्रिम उपायानें भरून काढावी, अशी सूचना करण्यांत येत आहे. ती सरकारनें मान्य केली, तर यंत्रसामुग्री, अन्नधान्य, रसायनें, लोकांच्या उपयोगाच्या सामान्य वस्तु, इत्यादींच्या आयातीवर परिणाम होऊन ह्या जिनसा महाग होतील. ज्या उद्योगधंद्यांचा तयार माल येथेंच खपतो, परंतु ज्यांची यंत्रसामुग्री व कच्चा माल परदेशांतून येतो, अशा धंद्यांना ही महागाई मारक होईल हें खरें असलें तरी एकूण नफ्यातोट्याच्या हिशेबांत फायदाच होईल असें सांगण्यांत येत आहे. रुपयाची किंमत उतरविली, तरी निर्गतीस आडकाठी आणणाऱ्या कितीतरी इतर बाबी आहेत. त्या दूर केल्याविना प्रगति होऊं शकणार नाहीं. आयातीमध्यें अन्नधान्याचा भाग बराच मोठा आहे. तें महाग झालें म्हणजे त्याची किंमत देण्याची तरतूद करण्याचा अवघड प्रश्न पुनः येणारच. इतरहि अनेक मुद्दे आहेत. तथापि, हिंदुस्थानानें रुपयाची किंमत आपण होऊन उतरविली नाहीं तरी ग्रेट ब्रिटन व इतर प्रमुख देश ह्यांनीं तो मार्ग पत्करला, तर हिंदुस्थानासहि त्याच मार्गानें जाणें भाग पडेल असें दिसतें. सध्याचा पौंड-डॉलरचा हुंडणावळीचा दर किती काळ टिकून रहातो, हेंच आतां बघावयाचें आहे.

## सावकारी कायद्याचा परिणाम

बॉंबे मनीलेंडर्स ॲक्टाची मुंबई प्रांतांत १७ नोव्हेंबर १९४७ रोजीं अंमलबजावणी सुरू झाली. तेव्हांपासून, गेल्या वर्ष अखेर एकूण १०,९१६ सावकारांनीं लायसेन्ससाठीं अर्ज केले. त्यांपैकीं ६,८९९ अर्ज पहिल्या लायसेन्सचे होते आणि ३,६१६ अर्ज जुने लायसेन्स रिन्यू करण्यासाठीं होते. सावकारी नियंत्रणामुळें कित्येक ठिकाणीं कायद्याप्रमाणें योग्य अटींवर कर्ज मिळूंच शकत नाहीं आणि कांहीं सावकारांनीं सावकारीहि बंद केली आहे. तथापि, सहकारी संस्थांचीं कर्जें, सरकारचीं तगाई कर्जें आणि मित्र व नातेवाईक ह्यांचेकडून बिन-व्याजीं घेतलेलीं कर्जें ह्यांत वाढ झालेली दिसते. जून १९४८ अखेर संपलेल्या वर्षी त्यापूर्वीच्या वर्षीच्या मानानें सहकारी सोसायट्यांनीं शेतकऱ्यांना ५४ लक्ष रुपयांचें कर्ज अधिक दिलें. तगाई कर्जेंहि वाढलीं. अर्बन व सेंट्रल बँकांना ( जेथें जिन्नस सुरक्षित ठेवण्याची सोय आहे तेथें ) सोन्याच्या व चांदीच्या दागिन्यांचे तारणावर कर्जें देण्यास परवानगी देण्यांत आली आहे.

## बँकेचे अध्यक्ष म्हणाले :

" बँकेंत काम करणाऱ्या लोकांचा एक स्वतंत्र वर्गच कल्पावा लागेल. हे सर्व नोकर साक्षर असून त्यांना बँकिंगच्या धंद्याचें तांत्रिक ज्ञान असतें. ते सुशिक्षित असल्यामुळें त्यांची गणना कारखान्यांतील कामगारांत करणें बरोबर होणार नाहीं. गिरण्यांतील काम यंत्राच्या गतीवर अवलंबून असल्यानें कामाचा ताण आणि शिथिलता नक्की अजमावतां येते. तसें बँकेच्या कामाबद्दल म्हणतां येत नाहीं. शिवाय, गिरण्याप्रमाणें बँका रात्रीचें काम करत नाहींत. तरी सुद्धां संयुक्त प्रांतांतील बँकांच्या नोकरांना वर्षांतून १५८ दिवस सुट्टी मिळते. ह्या दिवसांत ५२ तर रविवारच आहेत. ३५ सुट्ट्या सरकारी गॅझेटनें मंजूर केलेल्या आहेत. त्यांत ३ रविवारही येतात. त्याशिवाय ३० दिवसांची हक्काची रजा, १४ दिवसांची किरकोळ रजा आणि अर्धपगारी व भत्त्याहित ३० दिवसांची आजारीपणाची रजा मिळते. तरीसुद्धां बँकांतील नोकरांत बरीच अस्वस्थता दिसून येत आहे. चुकीचें तत्त्वज्ञान आणि राजकारण करणाऱ्या बाहेरच्या लोकांचा सल्ला ह्यांच्या योगानें हें असमाधान पसरलेलें आहे."

सर पद्मपाद सिंघानिआ,
हिंदुस्थान कमर्शिअल बँक

### भोर स्टेट बँकेचे दोन नवे डायरेक्टर

भोर स्टेट बँक लि. च्या डायरेक्टर बोर्डावर श्री. के. वि. केळकर, एम. ए., एलएल. बी. आणि ढाळीचे कारखानदार श्री. बाबालाल धंदुके, व्यापारी, ह्यांस कोऑप्ट करून घेण्यांत आलें आहे, असें समजतें. श्री. काकासाहेब शिंगरे हे बँकेचे चेअरमन आहेत.

### पूना अर्बन को. बँकेचा रौप्य महोत्सव

दि पूना अर्बन को. बँकेचा रौप्य महोत्सव शनिवारें ता. १६ जुलै रोजीं सायंकाळीं ५ वाजतां मुंबई सरकारचे अर्थ व सहकार मंत्री श्री. वैकुंठराय मेहता, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं गोखले हॉल, पुणें, येथें साजरा होणार आहे.

### डनलॉप कंपनीचा नफा

डनलॉप रबर कंपनीनें १९४८ सालीं १८२ कोटी रुपयांच्या मालाची विक्री केली. एकूण नफा ११ कोटी रुपये झाला. भागीदारांना १५% डिव्हिडंड मिळालें.

## बँक ऑफ पूना, लिमिटेड.

( शेड्यूल्ड बँक )

अधिकृत भांडवल रु. ५०,००,०००

विक्रीस काढलेलें भांडवल रु. २५,००,०००

वसूल भांडवल रु. १२,५०,०००

मध्यम वर्गीयांना मासिक उत्पन्नांतून एका रकमेनें मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागवत नाहीं. दरमहा ५ रु. नियमित शिल्लक टाकल्यास पांच वर्षांत ३०० रुपये स्वतःचे होतात. अशा बचत योजनेच्या रकमेवर ३ टक्क्यांपर्यंत व्याज मिळण्याची सोय.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जास्त माहितीसाठी मुख्य कचेरीस अगर शाखांस लिहा.

मुख्य कचेरीः—४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

स्थानिक शाखाः—( १ ) भवानी पेठ. ( २ ) सदाशिव पेठ.

बाहेर गांवच्या शाखाः—(१) टिळक चौक, सोलापूर, (२) वखार भाग, सांगली.



बेडेकर मसाले वापरा



नवीन पुष्कळ निघाले, तरी

## तुळजाराम मोदी, सातारा

ह्यांचें पुढारीपण कायम आहे.



### 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक )

पे-ऑफिसः—खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. बी. बी. वाळवेकर ( अध्यक्ष ) | श्री. के. पी. जोशी ( उपाध्यक्ष )

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०

विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०

वसूल भांडवल रु. ३,९८,२८५

एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.



उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

### ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू, इत्यादींसाठीं चौकशी कराः—

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG फोन : ३४५१९

औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें

( १ ) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज ( ले :—जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ. )

( २ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन ( ले.:—जे. बी. टेलर, किं. १ रु. )

( ३ ) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट ( ले :—. रेवि अॅले, किं. २ रु. )

( ४ ) इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज अँड व्हिलेज इंडस्ट्रीज इन बॉबे प्रॉव्हिन्स ( ले.:— एल. एन. रेणु, किं. १ रु. ४ आ. )


'हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५११ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.